**Covid-19**
**Top Most Priority**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371
E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचले : -

1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,
2) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्र.करोना2020/प्र.क्र.58/आरोग्य -5, दि.13/03/2020, दि.14/3/2020 तसेच दि.15/3/2020 रोजीच्या अधिसुचना

---

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.जि.आ.व्य/कावि/३६१ /2020.
पुणे, दिनांक :- ०५/04/2020.

**विषय:- कोरोना या विषाणूकचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणे करीता मास्क परिधान करणे बंधनकारक करणेबाबत**

## आदेश

ज्याअर्थी , महाराष्ट्र सरकारने भारतीय साथ रोग अधिनियम 1897 चे कलम 2,3 आणि 4 अन्वये प्रदान केलेल्या शक्तीने तसेच कोवीड -19 च्या रोग प्रतिबंधक उपाय योजना क्र.कोरोना 2020/सीआर /58/आरोग्य -5 दि.1/03/2020 नुसार नियंत्रण नियम ठरविले आहेत. तसेच उक्त अधिनियमाअंतर्गत व नियमावलीतील नियम 10 च्या अंतर्गत कोवीड-19 च्या नियंत्रणासाठी उपाय योजना करणेस जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे.

ज्याअर्थी , सदयस्थितीत असे आढळुन आले आहे की, अनिवार्य सामाजिक अंतर (Social Distanc) या उपाय योजना व्यतिरिक्त तोंडावर मास्क परिधान केल्याने कोरोना विषाणुचा प्रसार परस्परांशी संपर्क साधाणा-या व्यक्ती करिता कमी होऊ शकतो. तसेच कोरोना विषाणुच्या प्रसारास आळा बसु शकतो.

आणि ज्याअर्थी , उपरोक्त बाब विचारात घेता , मी असे निष्कर्षापर्यत आलो आहे की, सर्व सार्वजनिक ठिकाणी व इतर ठिकाणी फिरणा-या व्यक्तींनी व्यापक जनहिताच्या दृष्टीने तोंडावर मास्क परिधान करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी नवल किशोर राम, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण , पुणे उपरोक्त नमुद नियमाच्या नियम 10 अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार पुणे जिल्हयातील नागरिकांनी खालीलप्रमाणे नियंमाचे पालन करावे.**

1. सर्व व्यक्ती कोणत्याही हेतु साठी व कारणास्तव सार्वजनिक ठिकाणी जसे की, रस्ता , रुग्णालय, कार्यालय, बाजार पेठ, इत्यादी बाहेर जातील त्यावेळी त्या व्यक्तीने 3 प्लाय मास्क किंवा कपडयाचा मास्क परिधान करणे अनिवार्य आहे.
2. सर्व व्यक्तींनी आपल्या वैयक्तिक किंवा खाजगी वाहनाने प्रवास करते वेळी मास्क परिधान करणे अनिवार्य आहे.
3. सर्व कार्यालयामध्ये प्रवेश करणा-या सर्व अभ्यंगतांनी चेह-यावर मास्क परिधान करणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांना कार्यालयात प्रवेश देण्यात येणार नाही.

Scanned by CamScanner

4. सर्व शासकीय निमशासकीय , महानगर पालिका, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम व इतर सर्व कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी कार्यालयीन प्रवेशापासुन ते संपुर्ण कार्यालय सोडेपर्यंत मास्क परिधान करणे बंधनकारक करणेत येत आहे.
5. सदर मास्क हा प्रमाणीत मास्क असावा किंवा घरगुती कापडी धुण्या योग्य मास्क अथवा मास्क निर्जुकीकरणानंतर पुन्हा वापरता येऊ शकतात असे मास्क वापरावेत.
6. उक्त आदेश पुढील आदेश होई पर्यंत लागू राहील.

उपरोक्त सुचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या आदेशाचे उल्लंघन करणा-या व्यक्ती विरुध्द कारवाई करणेसाठी पोलीस अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना अधिकृत करण्यात येत आहे. या दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहिता कलम 188 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 याव्दारे आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी
पुणे

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रति-
1. पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड
2. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण
3. उपविभागीय दंडाधिकारी/ तहसिलदार सर्व ------------------------ यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
4. सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालये विभाग प्रमुख -------------जि.पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
5. जिल्हा माहिती अधिकारी पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत- मा. विभागीय आयुक्त , विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग पुणे माहितीसाठी सविनय सादर

Scanned by CamScanner